# प्रतिष्ठानच्या परिचय मेळाव्यात तरुणांची मनोगते

समाजकार्य म्हणजे प्रत्यक्ष अनुभवातून मिळालेली जगाच्या अभ्यासाची संधी असून समाजापुढे असंख्य गुंतागुंतीचे विषय असताना त्यांची उकल करण्यासाठी तरुणांनी पुढाकार घेतला पाहिजे व सकारात्मकतेने समाज सुधारणेची धुरा घेतली, तरच भवितव्य उज्ज्वल होईल असे प्रतिपादन लातूरच्या स्वारातीम उपकेंद्रातील सामाजिक शास्त्रे संकुलाचे सहायक प्राध्यापक डॉ. अनिलकुमार जायभाये यांनी केले.

सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठानतर्फे आयोजित तरुणांच्या मेळाव्यात ते बोलत होते. ग्रामीण भागात शिक्षणसंलग्न क्षेत्रात कार्य करणाऱ्या प्रतिष्ठानच्या उपक्रमांची माहिती सचिवांनी उपस्थितांना दिली. याप्रसंगी प्रतिष्ठानतर्फे आयोजित करण्यात आलेल्या ‘शनिवारी विज्ञानवारी’ या उपक्रमात ग्रामीण शाळांतून सप्रयोग कृतीसत्रे राबवणाऱ्या विज्ञान प्रसारक विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. अभिजात फिल्म सोसायटीचे अध्यक्ष श्री. जितेंद्र पाटील यांनीची यावेळी मार्गदर्शन केले. सहभागी प्रतिनिधी तरुणांनी यावेळी आपली दिलखुलास मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन प्रा. मनोहर कबाडे यांनी केले.




सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठान
तर्फे आयोजित
समाजकार्योत्सुक होतकरू
तरुणांचा परिचय मेळावा
दि. २३ फेब्रुवारी, २०२० रविवार
मार्गदर्शक - प्रा. डॉ. अनिल जायभाये
सहायक प्राध्यापक, सामाजिकशास्त्र संकुल,
स्वारातीम विद्यापीठ उपकेंद्र, लातूर
विनीत - प्रा. डॉ. संतोष कुलकर्णी, प्रा. मनोहर कबाडे, पुरुषोत्तम भांगे
एकूण लेख


समाजकार्योत्सुक
तरुणांचा परिचय
दि. २३ फेब्रुवारी, २०२०